Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue – 159

## Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality

Guest Editor:
Dr. Manjushree Bobade
Principal,
Rayat Shikshan Sanstha's
Dr. Babasaheb Ambedkar College,
Aundh, Pune 411 067

Executive Editor of the issue:
Dr. Vilas Sadaphal
Dr. Supriya Pawar
Prof. Eknath Zaware
Dr. Tanaji Hatekar
Prof. Kiran Kumbhar

Chief Editor:
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67 ★

Swatidhan International Publications
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. B.R.Ambedkar and Indian Constitution | Dr. Nalini Waghmare | 07 |
| 2 | Dr. Ambedkar's Thoughts on Women Empowerment | D. L. Khokale | 11 |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar's Thoughts on Annihilation of the Castes in Present Context | Dr. Rajendra N. Raskar | 14 |
| 4 | Dr. Babasaheb Ambedkar & Women Empowerment in India | Mrs. Vaishali Supekar | 16 |
| 5 | Dr. Ambedkar's Thoughts on Education | Tipusultan Inamdar | 19 |
| 6 | Dr. B. R. Ambedkar's Views on Democracy | Tansen Randive | 22 |
| 7 | Dr. Ambedkar's Thought on Education | Dr. V. D. Awari | 24 |
| 8 | Dr. Babashaeb Ambedkar : Versatile Personality | Sunil Kamble | 26 |
| 9 | भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | श्री. जीवन आयरे | 28 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार | प्रा.मेघराज भौटी | 31 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बहुआयामी व्यक्तिमत्त्व | डॉ. ज्योती बिडलान | 33 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | डॉ. संजीव बोडखे | 37 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली परिवर्तनवादी चळवळ आणि दलित स्त्रीवादी भूमिपृष्ट | डॉ. सुचित्रा नाईक | 40 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि सद्य:स्थिती | डॉ. संजय गायकवाड | 47 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीव्यवस्थेबद्दलचे विचार | डॉ. मनीषा जगदाळे | 50 |
| 16 | भारतीय रिझर्व बँकेच्या स्थापनेत डॉ. आंबेडकर यांचे योगदान | डॉ. जगदीश लांजेकर | 53 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार | डॉ. विलास सदाफळ व प्रा.किरण कुंभार | 59 |
| 18 | भारतीय संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. संतोष कदम | 62 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रविषयक दृष्टीकोण | डॉ. विठ्ठल केदारी | 66 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला विषयक विचार | डॉ. अनिल कोकाटे | 70 |
| 21 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. महेश कुलकर्णी | 73 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्त्व आणि दलित चळवळ | डॉ. रघुराज कुरुमकर | 77 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | डॉ. संजय लांडगे | 79 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वर्ग आणि वर्णीय संकल्पना | प्रा. नागराज मगरे | 82 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जातीनिर्मुलनविषयक विचारांची प्रस्तुतता | सचिन ओहोळ | 86 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी व शेतकऱ्यांसंबंधी विचारांचा अभ्यास | डॉ. पराग पाटील | 88 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यघटनेविषयी विचार | प्रा. अविनाश फलके | 92 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रवाद | नवनाथ राठोड | 95 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | डॉ. राजकुमार रिकामे | 98 |
| 30 | भारतीय जातीव्यवस्था आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर | डॉ. जयपाल सावन | 100 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संरक्षणविषयक धोरण | डॉ. बी. डी. तोडकर | 106 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय भूमिकेच्या वैचारिक अधिष्ठ्यांचा अभ्यास | प्रा. स्वाती साळवे | 112 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता | प्रा. एकनाथ झावरे | 115 |




202

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार

डॉ. विलास दामोदर सदाफळ
प्रा. किरण गणपत कुंभार
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,औंध, पुणे.

## प्रस्तावना

लोकशाही तत्त्वप्रणाली स्वीकारलेला भारत हा जगातील सर्वात मोठा देश आहे. २०११ च्या जणगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ एवढी आहे. एवढी बलाढय लोकसंख्या एका घटनेने बांधलेली आहे. यात ९ धर्म, ३०००जाती व २५०० उपजाती, आणि २७० मातृभाषा आहेत. एवढी विविधता दुसऱ्या कोणत्याही देशात पहावयास मिळणार नाही. ही विविधता एका सूत्रात बांधण्याचे महत्वपूर्ण कार्य लोकशाही या व्यवस्थेने केले आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताचे यश हे भारतात मजबूतीने उभ्या असणाऱ्या लोकशाहीचे आहे, असे म्हणने वावगे ठरणार नाही. ही लोकशाही निर्माण होणे, मजबूत पायावर उभी राहणे आणि देशाला प्रगती पथावर मार्गस्थ करण्यासाठी ज्या ज्या लोकांनी प्रयत्न केले; त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार जाणून घेणे गरजेचे आहे.

## लोकशाही व्यवस्थेविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

लोकशाही हा शासनसंस्थेचा प्रकार नसून प्राथमिक दृष्टीने एकत्रित जीवनाची ती पध्दती आहे. आपल्या बांधवांबद्दल आदराची आणि पूज्यतेची भावना किंवा दृष्टी ठेवणे असे तिचे तत्त्वत: स्वरूप असते.[१]

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची व्याख्या:

'लोकांनी, लोकांच्या हिताकरिता, लोकांकरीता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही.' ही अब्राहम लिंकन यांची लोकशाहीची व्याख्या पाहिली असता ती एक परिपूर्ण व्याख्या वाटते. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणणाऱ्या शासनव्यवस्थेच्या प्रकारास आणि पध्दतीस लोकशाही म्हणतात"[२] भारतात लोकशाही शासणव्यवस्था स्थापण करण्याच्या इच्छेतील मुख्य समस्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांगतात १)भारताच्या शासकीय वर्गाची स्थिती २)सर्वसाधारण वर्गाकरिता शासकीय वर्गाचे उद्दिष्ट आणि उद्देश.[३]

ही लोकशाही व्यवस्था एखाद्या देशाने स्वीकारली तरी ती किती यशस्वी होते हे पाहणे देखील गरजेचे असते. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही यशस्वी होण्यासाठी काही महत्वाच्या बाबी सांगितल्या आहेत.

## लोकशाही यशस्वी होण्यासाठी महत्वाच्या बाबी

१)समाजात भयानक विषमता असता कामा नये. २)विरोधी पक्षाचे अस्तित्व असले पाहिजे. ३)कायदा आणि प्रशासनाच्या संदर्भात सर्वांना सारखी समानता असने गरजेचे आहे. ४)संविधानाची नैतिकता महत्वाची आहे. ५)लोकनिष्ठा म्हणजेच सर्व अन्यायाच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा लोकांच्यात असने गरजेचे आहे. ६)बहुमतवाल्यानी अल्पमतवाल्यावर जुलूम करता कामा नये. ७)समाजाचे नैतिक अधिष्ठान कार्यशील ठेवणे आवश्यक आहे.[४]



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *
203

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 159 – Dr. Babasaheb Ambedkar : Versatile Personality
UGC Approved Journal

ISSN :
2348-7143
February-2019

लेकशाही व्यवस्था यशस्वी होण्याच्या मार्गावर असतानाच या लोकशाही व्यवस्थेला अडथळा निर्माण करणारे घटक देखिल असतात. या घटकालाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर
लोकशाहीचे प्रमुख शत्रू मानातात.

**लोकशाहीचे प्रमुख शत्रू**

१)हुकूमशाही: हुकूमशाहीमुळे निर्माण झालेली शक्ती किंवा सामाजिक संघटना कायम टिकू शकत नाही. कारण हुकूमशाहीची प्रेरणा ही मुळातच अबाधित स्वरूपाची नाही. ती प्रेरणा काढून घेतली की ती गडगडते. २)माणसा माणसातील भेद मानणारी नीती किवा संस्कृती: ही सामाजिक आणि आर्थिक भेद बुध्दीपुरस्सर करणारी संस्कृती, या दोन्हीही लोकशाही स्वरूपाला मोठे धोके आहेत.[५]

लोकशाही, गणराज्यापेक्षा तसेच संसदीय शासनापेक्षा पूर्णतः भिन्न आहे. लोकशाहीची मुळे, शासनाचा प्रकार संसदीय असो वा अन्य, यात दिसून येत नाहीत. लोकशाही सहजीवनाची एक पध्दत आहे. लोकांनी निर्मिलेल्या समाजात सामाजिक संबध, तसेच लोकांच्या परस्परातील सहजीवनात लोकशाहीची मुळे शोधावी लागतात.[६]
संसदीय सरकार व्यवस्था म्हणजे चर्चेद्वारे सरकार याहून कितीतरी अधिक आहे. तिचे दोन आधारस्तंभ आहेत १) विरोधी सदस्य २) मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका.[७]

**आर्थिक लोकशाहीची कल्पना:**

भारतीय घटनेत आर्थिक लोकशाहीची कल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली आहे. ज्यांना प्राथमिक अशा जीवनाश्यक गोष्टी मिळत नसतात, अशांचे समाधान करण्यावर तसेच त्यांना माणुसकीच्या दर्जापर्यंत आणण्यावरच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही.[८]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत केलेल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचे रूपही दिले पाहिजे. राजकीय लोकशाही तिला आधारभूत अशी सामाजिक लोकशाही नसल्यास टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तिचा अर्थ आहे, स्वातंत्र्य, समता, व बंधुभाव यांनी जीवनाचे सिध्दांत म्हणून मान्य करणारी जीवन प्रणाली. समता आणि स्वतंत्र्य बंधुभावापासून वेगळे करता येत नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे मूठभर लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय. स्वतंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वायला मारक ठरते. बंधुत्वाशिवाय समता आणि स्वातंत्र्य आस्तित्वात येणार नाही. स्वतंत्र्यता, समता व बंधुभाव सिध्दांत म्हणजे एकाच त्रयीची भिन्न भिन्न तत्त्वे मानता येणार नाहीत.[९]

**निष्कर्ष**

स्वातंत्र्य चळवळीतील वाटचालीत भारत देश लोकशाही प्रधान होईल असा संकेत जगाला मिळाला होता. भारतात नव्याने निर्माण होणारी लोकशाही एक आदर्श आणि विविधतेमध्ये एकतेला दर्शविनारी एक यशस्वी लोकशाहीव्यवस्था म्हणून जगाला मार्गदर्शन करनारी व्यवस्था बनविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार आज समाजाला नक्कीच मार्गदर्शक आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीची जी व्यख्या केली आहे, त्यात अहिंसेच्या मार्गाने लोकांच्या जीवनात आर्थिक आणि सामाजिक बदल झपाटयाने झाले पाहिजेत. जेणे करून आर्थिक सुबत्ता प्राप्त व्यक्ती



204

आपला सामाजिक स्तर उंचावेल, म्हणजेच लोकांच्या कल्यानाचा व त्याद्वारे देशहिताचा विचार त्यांच्या व्याख्येत दिसतो. लोकशाहीची इच्छा असताना ज्या प्रमुख समस्या त्यांनी सांगितल्या आहेत. त्यात त्यांनी शासकीय वर्गाची पार्श्वभूमि कोणती व त्याच पार्श्वभूमिचा शासक वर्गाची सर्वसाधारण वर्गाकरता असणाऱ्या उद्दिष्टांवर व उद्देशांवर परिणाम पडतो, असे त्यांना सांगायचे आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी ज्या बाबी सांगितल्या आहेत, त्या बाबींचा विचार केला असता असे लक्षात येते की संसदीय लोकशाहीत या बाबी लोक नियंत्रित लोकशाही निर्माण करू शकतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीचे जे प्रमुख शत्रू सांगितले आहेत; त्या शत्रूंकडे आधुनिक कालखंडात दुर्लक्ष करून चालनार नाही. कारण हुकूमशाही प्रवृत्ती आणि मानसा–मानसाती भेद यामुळे लोकशाहीला धोका पोहचू शकतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते लोकशाही सहजीवनाची एक पध्दत आहे. यातून लोकशाही; विषमता मोडून सर्वसामान्य ते विशिष्ट अधिकार प्राप्त जणसमुदाय यांच्यात परस्पर सकार्य वाढविनारी व्यवस्था सिध्द होते.संसदीय लोकशाहीत मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका या माध्यमातून निर्माण होनारा सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे देशाचे व लोकशाहीचे भविष्य निश्चित करतात.

आर्थिक आणि सामाजिक लोकशाही कल्पनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्थिक स्तरातील समतेशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकनार नाही. तसेच सामाजिक लोकशाहीत स्वातंत्र्य, समता व बंधुभाव स्विकारल्याशिवाय खऱ्या आर्थाने लोकशाही निर्माण होनार नाही.

## संदर्भ

१. Selected Works of Dr. B. R. Ambedkar, Drambedkar Books Publication , Page no. 105
२. बोल महामानवाचे, खंड २रा, अनु. आणि संपा. डॉ.नरेंद्र जाधव, ग्रंथाली प्रकाशन, पहिली आवृत्ती, २०१२, पृ. १७६
३. Selected Works of Dr. B. R. Ambedkar, mijksDr] i`-2256
४. बोल महामानवाचे, उपरोक्त, पृ. १७६, १७८
५. कित्ता, पृ. १८५
६. कित्ता, पृ. १८७
७. कित्ता, पृ. १७३
८. महाराष्ट्र टाइम्स ६ डिसेंबर २०१५
९. सर्वदर्शी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संपा.डॉ.पी विठ्ठल,डॉ.नागोराव कुंभार,डायमंड पब्लिकेशन्स, पहिली आवृत्ती, २०१६, पृ.९०

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya



205